<u>बेलीफमार्फत</u>

जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा.

—: दरपत्रक सुचना :—

मा. जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा या कार्यालयाचे उपयोगाकरीता टेबलक्लॉथ व न्यायालयाचे दरवाजे व खिडक्यांकरीता पडदे साहित्य खरेदी करावयाचे आहे. करीता स्थानिक बाजारातील विक्रेत्यांना सुचित करण्यात येते की, ज्यांना टेबलक्लॉथ व पडदे खरेदीबाबतचे 'दरपत्रक' जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा येथे दाखल करावयाचे आहेत, त्यांनी आपले 'दरपत्रक' सिलबंद लिफाफ्यामध्ये <u>दिनांक १४/१०/२०२६ रोजीचे, सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत</u> या कार्यालयात सादर करावयात.

खरेदी करावयाच्या साहीत्याचा तपशील

अ.क्र.	साहित्याची नावे	दर प्रती नग
१	टेबलक्लॉथ (साईज ६ X ४) चांगल्या प्रतीचे	प्रती नग
२	दरवाजे व खिडक्यांकरीता पडदे (चांगल्या प्रतीचे)	प्रती नग

स्वा/—
(हेमंत भ. गायकवाड)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
वर्धा.

<u>दरपत्रकाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे</u> :—

१) दरपत्रकावर ''<u>टेबलक्लॉथ व पडदयांचे दरपत्रक</u>'' असे ठळक अक्षरात लिहावे तसेच दरपत्रक पाठवणाऱ्या संस्थेचे/पुरवठादराचे/व्यक्तीचे नाव, पत्ता व मोबाईल नंबर स्पष्ट ओळखता येईल अशा प्रकारे लिहावे. तसेच दरपत्रकाच्या लिफाफामध्ये नमुना कागद जोडण्यात यावा.

२) वेळेनंतर प्राप्त झालेल्या दरपत्रकांचा कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही.

३) दरपत्रकामध्ये प्रती नगाचे दर नमुद करावे.

४) दरपत्रकातील दर हे सर्व करांसह नमुद असलेले दराचा उल्लेख करावा.

५) दरपत्रक मंजुर किंवा नामंजुर करण्याचा सर्वस्वी अधिकार जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा अंतर्गत गठीत स्थानिक खरेदी समितीला राहिल.

६) दरपत्रकातील नमुद साहित्याचा दर्जा पाहण्याची आवश्यकता भासल्यास त्या वेळी सादर करावे लागेल.

७) दरपत्रकातील नमुद दराप्रमाणेच वस्तुंचा/साहित्याचा पुरवठा करावा लागेल.

८) साहित्याचा पुरवठा आदेश दिल्यानंतर साहित्य जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा येथे स्वत:च्या खर्चाने (दरपत्रक मंजुर झालेला संस्थेला/व्यक्तीला/विक्रेत्यास) आणुन दयावे लागेल. त्याबाबत या कार्यालयामार्फत कोणताही वाहतुकीचा व इतर खर्च दिला जाणार नाही.

९) दरपत्रकातील दराप्रमाणेच वस्तुचा आदेशाप्रमाणे व दरपत्रकातील दराप्रमाणे प्राप्त झाल्याची खात्री झाल्यानंतरच सदर वस्तुच्या देयकाबाबतची पुढील कार्यवाही करण्यात येईल.

पृष्ठांकण क्र. 8495 /रो.व.वि.वि./२०२६.
जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा.
दिनांक : 08/१०/२०२६.

प्रतीलीपी माहीती व योग्य कार्यवाहीस अग्रेषित :–

१) जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
२) जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
३) जिल्हा परिषद कार्यालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
४) तहसिल कार्यालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
५) सार्वजनिक बांधकाम विभाग, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
६) नगर परिषद कार्यालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
७) जिल्हा संगणक प्रणाली, जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा
सदरची प्रत जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा चे संकेतस्थळावर प्रसिध्दिकरीता.

दि.०८/१०/२०२६

प्रबंधक
जिल्हा व सत्र न्यायालय,
वर्धा.